प्रेसनोट

जा.क्र. ५५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—३१/०८/२०१६

# "२०१६ पावसाळी पोलीस क्रिडा समारोपन"

**भंडारा** :— आज दि. २८/०८/२०१६ रोजी पोलीस कवायत मैदानावर भंडारा जिल्हयातील पोलीस क्रिडा स्पर्धा समारोपनाचे वेळी प्रमुख पाहुने मा. श्री. जिल्हाधिकारी साहेब डॉ. अभिजीत चौधरी, व आयोजक मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संखे साहेब साकोली, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. धात्रक साहेब, पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. कोलवाडकर, हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात ही पुष्पगुच्छ देवुन स्वागत समारंभानी झाली.

यावेळी कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करतांनी पोलीस कर्मचा—यांना खेळाचे महत्व व फायदे सांगुन खेळाडुना अधिका—अधिक प्रोत्साहन करुन खेळाडुचे उत्साह वाढविले. जास्तीत जास्त पो. कर्मचा—यांनी वेळात वेळ काढुन खेळास प्राधान्य दयावे त्यामुळे आपल्या शरीराचा फिटनेस साधता येतो. व्यायामामुळे शरीर तंदुरूस्त राहते. असे आयोजक जिल्हाचे पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांनी सांगीतले. त्यावेळी उपस्थित असलेले जिल्हयातील पाच उपविभागांचे खेळाडुंनी सदर स्पर्धेत भाग घेतला. पोलीस मुख्यालय, उपविभाग भंडारा, उपविभाग तुमसर, उपविभाग साकोली, उपविभाग पवनी येथील पोलीस पुरुष व पोलीस महीला यांचा समावेश होता. त्यामध्ये सांघीक खेळ— हॉकी फुटबॉल, हालीबॉल, बॉस्केट बॉल, हॅन्डबाल कबड्डी, खो—खो, तसेच वैयतिक खेळामध्ये १०० मिटर धावणे, २०० मिटर धावणे, ४०० मिटर धावणे, ८०० मिटर धावणे, १५,००० मिटर धावणे,५,००० मिटर धावणे, ४ बाय १०० मिटर रिले, गोळाफेक, भालाफेक, लांबउडी, तिहेरी उडी यामध्ये विविध खेळाचे आयोजन घेण्यात आले. संगीत खुर्ची या स्पर्धामध्ये मा. पोलीस अधिक्षक मॅडम तसेच पोलीस महीला कर्मचारी व कर्मचा—यांचे कुटुंबातील व्यक्तीना खेळात समावेश देण्यात आले. व रस्सा स्पर्धे मध्ये मा. जिल्हाअधिकारी साहेब व पोलीस अधिकारी यांनी भाग घेवुन स्पर्धेला प्रोत्साहन दिले. तसेच या स्पर्धेमध्ये बेस्ट ॲथलिष्ट पुरुष पो.शि. महेश नेताम व बेस्ट ॲथलिष्ट महीला म.पो.शि. माधुरी चामट यांनी प्रथम पारितोषीक मिळविले. तसेच चारही उपविभागापैकी पोलीस मुख्यालय येथील खेळाडु कर्मचारी यांनी प्रथम पारीतोषीक मिळविलेला आहे.

कार्यक्रमाला मा. श्री. जिल्हाधिकारी साहेब डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते दिप विझवुन पो. क्रिडा स्पर्धेचे समारोपन केले व आभार प्रदर्शन पो. नी. स्थागुशा श्री. कोलवाडकर यांनी केले. कार्यक्रमांच्या समारोपनाचे संचालन सौ. आरती देशपांडे तसेच म. पो. शि. योगिनी नाकतोडे यांनी केले.

पोलीस अधिक्षक
भंडारा.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.